भुसंपादन निर्देशन अर्ज क्र. १६३/२०१९
गणपत वास्कर (मयत) तर्फे वारस
वि.
विशेष भुसंपादन अधिकारी वगैरे
**CNR NO. MHRG**020031472023

## <u>निशाणी क्र. ४५ वरील आदेश</u>
(पारित दि. २२.१२.२०२५)

अर्जदार यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ व नियम १० व आदेश ६ नियम १७ अन्वये केला आहे. त्यांचे कथन असे की, दिनांक ०५/१०/२०२० रोजीच्या पत्राप्रमाणे भुसंपादन हे कार्यकारी अभियंता यांनी केल्याचे नमुद केले आहे. त्यामुळे सदर कार्यकारी अभियंता हे आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे अर्जदाराने प्रस्तावित सामनेवाला क्र. ४ म्हणुन कार्यकारी अभियंता यांना याकामी समाविष्ट करण्याची विनंती केली आहे. ती दुरुस्ती होवुन मिळावी अशी अर्जदाराची विनंती आहे.

०२. सामनेवाला क्र. २ याने अर्जास हरकत घेतली की, संभाव्य दुरुस्तीमुळे अर्जाच्या स्वरुपात फरक पडेल त्यामुळे अर्ज फेटाळण्यात यावा.

०३. अभिलेख पाहिला. अर्जदाराने सामनेवाला क्र. ४ म्हणुन कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भिंगारी, ता. पनवेल, जि. रायगड यांना समाविष्ट करण्याची विनंती केली आहे. सदर दुरुस्तीने अर्जाच्या स्वरुपात फरक पडत नाही. नुकसानभरपाईसाठी योग्य ते पक्षकार असणे आवश्यक असते. त्यामुळे अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब आदेश.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| | |
| २. | अर्जदाराने पुढील तारखेपर्यंत अर्जामध्ये दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत दयावी. |

AMOL ASHOK SHINDE

Digitally signed by AMOL ASHOK SHINDE
Date: 2025.12.23 10:53:34 +0530

**अलिबाग,** **(अमोल अ. शिंदे)**

**दिनांकः २२.१२.२०२५** **सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अलिबाग**